राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र. रामाआ/२३४४/२०१७/सोलापूर
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**विधान भवना समोर, पुणे - १**

युन्नुस ताजुद्दीन सय्यद. अपिलार्थी

**विरुध्द.**

जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक,
उप अधीक्षक भूमि अभिलेख, ता. माढा, जि. सोलापूर. उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक,
उप अधीक्षक भूमि अभिलेख,ता. माढा, जि. सोलापूर.

<u>व्दितीय अपील सुनावणी दिनांक २०/१२/२०२१</u>

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१/०१/२०१७ | - | २०/०३/२०१७ | - |

अपिलार्थी यांनी दि ३१/०५/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

प्रस्तुत द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी सेवानिवृत्त आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जोडपत्र 'अ' मध्ये जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

'कुर्डुवाडी येथील क.ग.नं.१४४ चे कामी हद्दीखुणा कायम करणेबाबत दि. ३०/०१/२०१७ रोजी दिलेली नोटीसा व बजावणी रिपोर्ट मिळणेबाबत.'

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'मुदतीत कागदपत्रे दिली नाहीत.' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक ३१/०१/२०१७ रोजीचा असुन तो तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमि अभिलेख माढा, जि. सोलापूर यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.८/५/२०१७ रोजी उत्तर दिलेले आहे.
२) सुनावणीचेवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,. दि.८/५/२०१७ च्या पत्राने उत्तर दिलेले आहेत. अर्जदाराने प्रथम अपिल केलेले नाही, त्यामुळे सुनावणी झाली नाही. अर्जदार मयत आहेत. आयोगाच्या सुनावणी नोटीशीनंतर अर्जदाराच्या भावाने सदर माहिती स्विकारलेली आहे.
३) अपिलार्थीचे प्रथम अपिल दिनांक २०/०३/२०१७ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारीत करण्याची कार्यवाही केलेली नाही, असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते. अर्जदार मयत असून आयोगाच्या नोटीशीनंतर अर्जदाराच्या भावाला माहितीही पुरविली असून त्यांना द्वितीय अपिल चालविण्याचे नाही असे लेखी निवेदन दिलेले आहे.
४) उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जास उत्तर दिलेले आहे. तत्कालिन अपिलीय अधिकारी यांनी अपिल सुनावणी घेतली नाही आदेशाही पारीत केलेला नाही. अपिलार्थी मयत असून त्यांच्या भावाने माहिती स्विकारलेली आहे व त्यांनी अपिल निकाली काढण्याबाबतचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेले आहे.

सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

1385/2022/सोलापूर/2344/2017
जावक क्र.

दिनांक - 13/6/2022